उप आयुक्त (जनरल) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. उआ/से/ ३०६
दिनांक :- २८/४/१२

## कार्यालय परिपत्रक

**विषय :-** मनपा कर्मचारी / अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल वेळचेवेळी लिहणे.
**संदर्भ :-** जा. क्र. उआ/से/२२६, दि. २१/०४/२०१२

सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. सीएमआर-१२१०/प्र. क्र. ४७/तेरा, दि. ०१/११/२०११ व सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक सीएफआर-१२११/प्र. क्र. २१७/तेरा, दि. १७/१२/२०११ नुसार अधिकारी / कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल ३१ मार्च नंतर लगेच लिहून / पूर्नविलोकन करुन जतन करणेबाबतच्या सुचना दिल्या आहेत.

सन २०११-१२ या वर्षाचे स्वयंमुल्य निर्धारण अहवालासह गोपनीय अहवाल प्रतिवेदन अधिकाऱ्यांकडे १५ एप्रिल पर्यंत किंवा उशिरात उशिरा ३० एप्रिल पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. प्रत्येक वर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी व त्यास जोडून येणाऱ्या रविवारी जिल्हा स्तरावर व तालूका स्तरावर गोपनीय अहवाल प्रतिवेदन करण्यासाठी विशेष कॅम्प आयोजित करण्याचे शासनाचे आदेश आहेत. त्या अनुषंगाने पुणे मनपा प्रशासनाची रचना विचारात घेवून, कॅम्प आयोजित करण्याची कार्यवाही करावी लागणार आहे.

सबब सदर कॅम्प आयोजित करण्याबाबत संदर्भांकित कार्यालय परिपत्रकान्वये महापालिका आयुक्त कार्यालयासमोरील सभागृहात दिनांक २३/०४/२०१२ रोजी सकाळी ११:०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती.

संदर्भांकित कार्यालय परिपत्रकन्वये दिलेल्या सुचना विचारात घेवून संबंधित खातेप्रमुख/ उप आयुक्त (वि.का.क्र. १ ते ४ ) यांनी त्यांचे नियंत्रणाखालील सेवकांचे गोपनिय अहवालाबाबत कॅम्प आयोजित करण्यासाठी खालील तपशिलाप्रमाणे कार्यक्रम निश्चित करुन देण्यात येत आहे.

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | कार्यक्रम दिनांक | स्थळ | |
|---|---|---|---|---|
| १) | स्वयंमुल्य निर्धारण अहवाल सादर करणे | दि. ३० एप्रिल २०१२ पर्यंत | वॉर्डस्तरीय, म.न.पा. भवन व इतर कार्यालयीन सेवक - | महापालिका सहाय्यक आयुक्त क्षेत्रिय कार्यालय, खातेप्रमुख/विभागप्रमुख कार्यालय. |
| २) | गोपनिय अहवालाचे प्रतिवेदन करणे. | दि. १२ व दि. १३ मे २०१२ | वॉर्डस्तरीचे सेवक - | महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय. |
| | | | म.न.पा./इतर कार्यालयातील सेवक- | खातेप्रमुख/विभागप्रमुख यांचे कार्यालय. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३) | गोपनिय अहवालाचे पुर्नविलोकन करणे. | दि. २६ व दि. २७ मे २०१२ | वॉर्डस्तरीचे सेवक - | उप आयुक्त (वि.का. क्र. १ ते ४ ) |
| | | | म.न.पा./इतर कार्यालयातील सेवक – | महापालिका आयुक्त कार्यालया समोरिल सभागृह |

या शिवाय दि. २३/०४/२०१२ रोजी पुणे म.न.पा.च्या कॅप्टन वडके सभागृह येथे सर्व संबंधित नोडल ऑफिसर यांना गोपनिय अहवालाबाबत करावयाच्या पुर्तते विषयी सविस्तर सुचना उप आयुक्त (जनरल) यांनी दिल्या आहेत.

तरी, वरिल प्रमाणे विहित केलेल्या कार्यक्रमानुसार संबंधित खातेप्रमुख/उप आयुक्त (वि.का.क्र. १ ते ४) यांनी गोपनिय अहवालाचे प्रतिवेदन आणि पुर्नविलोकन करण्याची कार्यवाही करुन त्या बाबतचा अहवाल मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांजकडेस दिनांक ३१ मे २०१२ पर्यंत सादर करावा.

अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि)
पुणे महानगरपालिका

प्रत :-
मा. खातेप्रमुख,
मा. उप आयुक्त (वि.का.क्र. १ ते ४)
मा. महापालिका सहा. आयुक्त
(क्षेत्रिय कार्यालय)

यांजकडेस माहिती व जरुर त्या पुढील कार्यवाही साठी

26/4/12
उप आयुक्त (जनरल)
पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक २ee
दिनांक 26/4/12